आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १९८ लगत जोड

(आरोपीस जेल प्रशासनाने आज प्रत्यक्ष हजर केले नाही. सदर आरोपीची हजेरी ही व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात आलेली आहे. सदर आरोपीचे वकील न्यायालयात हजर असुन आरोपी व्ही.सी.द्वारे सदर केसमधील न्यायालयीन कामकाजात हजर आहे.)

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १९ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — विजयकुमार श्रीकृष्णराव बोत्रे

वय —५९ वर्षे, व्यवसाय — निवृत्त पो.नि.

राहणार— बीड

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>—**

सन २०१८ ते२०२१पावेतो मी पारनेर पो.सटे.येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. दि. १९.३.२०२१ रोजी ठाणे अंमलदार निकम यांनी गु.र.नं.१८०/२०२१ भादवि क.४०६,४०८ वइतर या गुन्हयाचा तपास वरिष्ठांच्या तोंडी आदेशान्वये माझ्याकडे दिला. आदेशासोबतमला फिर्याद, एफआयआरची प्रत, दैनिक अहवाल व फिर्यादीने दाखल केलेले कागदपत्र प्राप्त झाले. कागदपत्रांचे अवलोकन करुन मी पंचांबाबत फोन करुन विचारपुस केली. परंतु त्यादिवशी पंच न मिळाल्याने आरोपीचे शोधकामी आम्ही आरोपीच्या गावी गेलो. आरोपी गावात व घरी मिळुन आला नाही. त्यानंतर आम्ही परत पो.स्टे.ला आलो. त्यानंतर पुन्हा दि.२१ तारखेला आम्ही आरोपीच्या गावी गेला व त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाहीव त्याचा फोन नंबर मिळाला नाही. त्यानंतर दि.२४.३.२०२१ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडीया वडझीरे येथे जावुन घटनास्थळाचा २ पंचांसमक्ष पंचनामा केला. आरोपीने लोकांचे फिक्स डिपॉझीटचे पैसे त्याच्या खात्यावर वळवुन पैश्यांचा अपहार केला होता. मी सकाळी ११.३० ते १२.३० दरम्यान पंचनामा केला होता. घटनास्थळ पंचनाम्यावेळी बँकेचे कृषी अधिकारी विद्या उघडे यांनी दाखवले होते. त्यानंतर मी माझ्या मोबाईलमध्ये घटनास्थळाचे ६ फोटो काढले. ते फोटो आर्टीकल अ१ ते अ६ वर दाखल आहेत. त्या फोटोत मी,२ पंच व ज्यांनी घटनास्थळ दाखवले ते अधिकारी हजर आहेत. घटनास्थळाच्या पुर्वेस पांडुरंग बोरकर यांची

मोकळी जागा, पश्चीमेस ग्रामपंचायत चौक, दक्षीणेस राजकुमार येरंडे यांची मोकळी जागा व उत्तरेस वडझीरे गावात येण्या जाण्याचा रस्ता व त्यापलीकडे दांडे क्लीनीक आहे. त्याचा मिळकत क्र.२०८ व सि.स.नं.७७ असा होता. आरोपी बँकेत कुठे बसायचा ती जागा मला उघडे मॅडम यांनी दाखवली होती. आता मला नि.४० वर घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. तो पंचनामा मी पंचांसमक्ष केला होता. त्यावर माझी व २ पंचांची सही आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे.

दि.२७.३.२०२१ रोजी ज्या लोकांची फसवणुक झाली आहे त्या ८ साक्षीदारांना मी पो.स्टे.ला बोलावुन त्यांचे जबाब त्यांच्या सांगितल्याप्रमाणे नोंदवले. दि.२८.३.२०२१ रोजी मी निलंबीत केलेल्या कॅशीयरचा जबाब नोंदवला. त्यानंतर मी दि.२.४.२०२१ रोजी आणखी लोकांची फसवणुक केल्यासंदर्भात फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला. दि.२०.५.२०२१ रोजी मी अक्षय तोडकर याचा जबाब नोंदवला. त्यानंतर दि.१७.९.२०२१ रोजी माझी बदली झाली. त्यामुळे सदरचा तपास कागदपत्रांसह एपीआय राजेश काळे यांचेकडे वर्ग केला.

सरतपास संपला.

मध्यान्हाची वेळ झाल्याने तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.12.03 11:25:09 +0530

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः ०१/१२/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

**<u>उलटतपास मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की माझ्याकडे दि.१९.३.२०२१ रोजी तपास आल्याबाबत लेखी कागदपत्र नाही. सदर गुन्हयासंदर्भात स्पेशल ऑडीट झाल्याचे मला माहीत नाही. स्पेशल ऑडीटच्या आधारे फिर्याद दाखल झाल्याचे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये कोणाच्या आयडीवरुन व्यवहार झाले हे नमुद असतानाही तुम्हाला फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवतेवेळी स्पेशल ऑडीट रिपोर्ट पाहण्याची गरज वाटली नाही का?

उत्तर– त्यावेळी पुरवणी जबाब देताना फिर्यादीकडे स्पेशल ऑडीट रिपोर्ट नव्हता.

मी हेड ऑफीसला स्पेशल ऑडीट रिपोर्ट मागवण्याबाबत पत्र व्यवहार केला नाही.

प्रश्न– साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदवण्याकामी तुम्ही काय कागदपत्र पाहीले होते?

उत्तर– अजुन लोकांची त्यामध्ये नावे पुढे आल्याने पुरवणी जबाब नोंदवला. मी पुरवणी जबाब नोंदवण्याकामी कागदपत्र पाहीले नव्हते.

मी नागेंद्रकुमार पंडा यांचा पुरवणी जबाब नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की मी कोणतीही चौकशी न करता बेकायदेशिरपणे फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला.

प्रश्न– कॅशियर बोरुडे यांना का निलंबीत केले होते?

उत्तर– या प्रकरणामध्ये निष्काळजीपणा केल्यामुळे त्यांना निलंबीत केले होते.

कॅशियर बोरुडे यांच्याकडुन काय निष्काळजीपणा झाला त्यासंदर्भात मी त्यांच्याकडुन चौकशी केली होती. त्या चौकशीवरुन कॅशियर बोरुडे सदर केसमध्ये आरोपी असल्याचे निष्पन्न झाले नाही. कॅशीयर बोरुडे यांच्या आयडीवरुन झालेल्या व्यवहारांसदर्भात मी बँकेकडुन मागणी केली होती. मागणी केल्यानंतर कॅशीयर बोरुडे यांच्या आयडीवरुन झालेल्या व्यवहारांसदर्भात मला सर्व माहीती मिळाली नाही. माहीती न मिळाल्याने मी पुन्हा बँकेकडे पत्रव्यवहार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला तपासाकामी बँकेकडुन सहकार्य मिळाले नाही. कॅशीयर बोरुडे यांच्या शिक्षणाबाबत मी कागदपत्रे तपासली नाहीत. बँकेकडुन कॅशीयर बोरुडे यांनी काय निष्काळजीपणा केला यासंदर्भात माहीती मागवली होती. मी माझा या तपासाचा चार्ज पुढील तपासी अधिकारी यांना देईपर्यंत मला ती माहीती मिळाली नव्हती. हे मला आठवत नाही की तक्रारदाराने खातेदारांचे दिलेले तक्रारी अर्ज मी पाहीले होते. हे म्हणणे खरे नाही की अक्षय तोडकर याने त्याच्या तक्रारी अर्जात कॅशीयर बोरुडे, विद्या उघडे व भुषण संखे यांनी त्याची फसवणुक केल्याचे व ते सुध्दा आरोपी असल्याचे सांगितले होते. आता मला नि.६८ वरील प्रमिला शेंडकर यांचा तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. तो अर्ज माझ्या काळात आला नाही. तक्रारदारांनी बँकेकडे दिलेले अर्ज मी मागवले होते. प्रमिला शेंडकर यांचा जबाब नोंदवतेवेळी त्यांचा

तक्रारी अर्ज मागवला नव्हता. मी बँकेकडुन खातेदारांचे तक्रारी अर्ज मागवले होते मात्र मला ते बँकेकडुन मिळाले नाही. मी केवळ मुदतठेव पावत्यांचे झेरॉक्स तपासावेळी मागवले होते. हे म्हणणे खरे आहे की मुदतठेव पावत्यांचे झेरॉक्स मागवल्यामुळे माझ्याकडे त्याच्या मुळ पावत्या नसल्याने त्यावरील अक्षर कोणाचे आहे व सही खरी आहे की डुप्लीकेट आहे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की साक्षीदारांचे जबाब मी कागदपत्रांची पडताळनी न करता केवळ त्यांच्या सांगण्यावरुन जबाब नोंदवले.

प्रश्न– जबाब देताना तुम्ही कोणताही मुळ कागद मागवुन घेतला नाही?

उत्तर– साक्षीदारांकडुन मी मुळ कागद मागवला नव्हता.

हे म्हणणे खरे आहे की फिर्यादवेळी मला बँकेकडुन झेरॉक्स कागदपत्रे मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की झेरॉक्स कागदपत्रांवरुन निष्कर्ष काढणे अवघड असते. हे म्हणणे खरे आहे की केवळ फिर्यादी व साक्षीदार यांच्या जबाबाप्रमाणे मी जोपर्यंत तपासी अधिकारी होतो तोपर्यंत तपास केला.

घटनास्थळ पंचनाम्यावेळी बँकेत विद्या उघडे व इतर कर्मचारी उपस्थित होते. मी घटनास्थळाचा सर्वे नंबर बँकेच्या रेकॉर्डवरुन तपासुन घेतला. जागा मालकाचा जबाब मी घेतला नाही. आरोपी बँकेत सन २०१४ पासुन ते अपहार होईपर्यंत कार्यरत होता. आरोपीला बँक मित्र म्हणुन नेमलेल्या एजन्सीमधुन एकही साक्षीदार मी तपासला नाही. वक्रंगी एजन्सी व सीएससी या एजन्सीकडुन आरोपी बँक मित्र म्हणुन नेमला होता. आरोपीला व्यवहाराची किती मर्यादा आहे याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की सदरचा अपहार हा आरोपीच केवळ एकटा करु शकत नाही.

प्रश्न– आरोपीस व्यवहाराची किती मर्यादा आहे हे माहीत नसताना तुम्ही आरोपीचकेवळ अपहारास जबाबदार होता हे कशाचे आधारे सांगता?

उत्तर– फिर्यादी व साक्षीदारांच्या जबाबाच्या अनुषंगाने सांगतो.

हे म्हणणे खरे आहे की कागदपत्रांची पडताळणी न करता केवळ साक्षीदारांच्या जबाबांवरुन आरोपीने गुन्हा केल्याचे अनुषंगाने मी पुरावा गोळा केला. मी पुन्हा सांगतो की मी कागदपत्रांची पडताळी केली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर गुन्हयात कॅशीयर बोरुडे, विद्या उघडे व भुषण संखे हे देखील आरोपी असताना

केवळ त्यांना वाचवण्यासाठी मी गौतम जाधव यास एकटे आरोपी केले.

प्रश्न– स्पेशल ऑडीट करणा–या लोकांकडुन तुम्ही चौकशी केली होती का?

उत्तर– त्या काळात स्पेशल ऑडीट झाले नाही.

फिर्यादीने पुरवणी जबाब देतेवेळी पावत्यांच्या झेरॉक्स सोबत आणल्या होत्या. त्याच्या मुळ पावत्या तपासासाठी लागतील असे मी फिर्यादीस तोंडी सांगितले होते. माझ्याकडे फिर्यादीने मुळ पावत्या दिल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने मला तपासाकामी सहकार्य केले नाही. पंचनामा करण्यासाठी पंचांना मी तोंडी बाहेरुन बोलावले होते. दोघे पंच ओळखीचे नव्हते, ते वडझीरे गावाचे होते. त्यांना बोलावल्यावर पंचनाम्याची कल्पना दिली. विद्या उघडे यांनी आरोपी कुठे बसायचा याची माहीती दिली होती. बॅंकेतील सीसीटीव्ही फुटेज मी चेक केले नव्हते. बॅंकेत सीसीटीव्ही असल्याचे मला सांगता येणार नाही. पंचनाम्यावेळी ब्रॅंच मॅनेजर कोण होते हे माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की दोन्ही पंचांना शाखाधिकारी यांनी पंचनाम्यापुर्वीच बोलावुन माहीती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी साक्षीदारांचे खोटे जबाब नोंदवले व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.12.03 11:25:17 +0530

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः ०१/१२/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,
पारनेर.